**Publication**: Loksatta
**Date:** 24.02.2017
**Page no:** 13
**Language:** Marathi

# आभासी चलन उद्योगाचा भारतात संघटित मंच

व्यापार प्रतिनिधी, मुंबई

**रोकडरहित व** डिजिटल व्यवहारांवर आधारित अर्थव्यवस्थेकडे भारताच्या सुरू असलेल्या बिटकॉइन्स या आभासी चलनाने उचल घेणे क्रमप्राप्तच होते. या पार्श्वभूमीवर झेब्पे, युनिकॉइन, कॉइनशुअर आणि सर्चट्रेड या चार बिटकॉइन क्षेत्रातील नवोद्योगांनी एकत्र येत 'डिजिटल ॲसेट ॲण्ड ब्लॉकचेन फाऊंडेशन ऑफ इंडिया (डीएबीएफआय)' या नावाने संघटना सुरू केली आहे.

सध्या भारतात कोणत्याही यंत्रणेचे नियंत्रण आणि नियमन नसलेल्या या उद्योग क्षेत्राने स्वयं-नियमनाने, सुसूत्रित आणि पारदर्शकतेने वाटचाल करावी, असा या डीएबीएफआय या मंचाच्या स्थापनेमागील उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात आले. या उद्योगासाठी नियमनाची आखणी करण्याकरिता आंतरराष्ट्रीय विधिज्ज्ञ संस्था निशित देसाई असोसिएट्सची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या कार्यकारी मंडळाचे नेतृत्व झेब्पेचे मुख्य कार्यकारी सौरभ अगरवाल यांच्याकडे सदस्य म्हणून संदीप गोएंका (झेब्पे), मोहित कालरा (कॉइनशुअर), सात्त्विक विश्वनाथ (युनिकॉइन), हरीष बी. व्ही. (युनिकॉइन) आणि विशाल गुप्ता, रश्मीत गुप्ता (सर्चट्रेड) यांचा समावेश आहे.

जगभरातील ताज्या प्रवाहानुसार, बिटकॉइन या आभासी चलनाची लोकप्रियता वाढत असून, आगामी काही वर्षांत अनेक देश कागदी चलनाच्या छपाईऐवजी या आभासी चलनाचाच वैध चलन म्हणून स्वीकार करतील, असे कयास केले जात आहे. भारतातही गतवर्षी नोव्हेंबरपासून अमलात आलेल्या निश्चलनीकरणानंतर, बिटकॉइनमधील उलाढाल लक्षणीय स्वरूपात वाढल्याचे आढळले आहे. युनिकॉइनच्या सात्त्विक विश्वनाथ यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, भारतात फेब्रुवारी २०१६ मध्ये प्रति बिटकॉइनचे मूल्य ४५९ अमेरिकी डॉलर होते, ते फेब्रुवारी २०१७ मध्ये १,११० डॉलरवर पोहोचले आहे.